MHST0500 0584 2012

**<u>नियमित दिवाणी दावा क्र.५०७/२०१२ मधील निशाणी क्र.१५० चे अर्जावरील आदेश</u>**

**सौ. रंजना शशिकांत घाडगे वि. १. श्री. जगन्नाथ शंकर सुर्वे (मयत)**

**२. सौ. शांताबाई जगन्नाथ सुर्वे व इतर**

**(दि.३० ऑगस्ट २०२५)**

प्रतिवादी क्र.३ व ४ यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ अन्वये तुर्तातूर्त ताकिद आदेश मिळावा याकरीता दाखल केलेला आहे.

०२. अर्ज व त्यावरील प्रतिवादी क्र.५ ते ७ यांचे म्हणणे पाहिले. प्रतिवादी क्र.३ व ४ यांच्या तर्फे विधीज्ञ श्री. ए. आर. डांगे व प्रतिवादी क्र.५ ते ७ यांच्या तर्फे विधीज्ञ श्री. एस. ई. दिवटे यांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी क्र.५ ते ७ यांच्या विधीज्ञांनी त्यांचे युक्तीवादाचे समर्थनार्थ :-

> **जोगिंदर कुमार वि. कुसम लता**, या मा. हिमाचल प्रदेश उच्च न्यायालयाच्या न्यायनिवाड्याचा आधार घेतलेला आहे. सदरच्या न्यायनिवाड्यामध्ये परिच्छेद क्र.४६ मध्ये असे नमूद केले आहे की,
>
> > ''सह-मालकाला दुसऱ्या सह-मालकाला सामान्य मालमत्तेतील त्याचे हक्क पूर्णपणे आणि सोप्या पद्धतीने ओलांडण्यापासून रोखणारा मनाई आदेश मिळण्याचा अधिकार नाही कारण तो सह-मालक आहे, जोपर्यंत मालमत्तेचा ताबा असलेल्या व्यक्तीचे कोणतेही कृत्य सह-मालकाच्या हिताला बाधा पोहोचवणारे किंवा त्याच्या ताब्यातून बाहेर काढणारे नसते.''

०३. अर्ज व म्हणणे यामध्ये आलेल्या कथनांवरून खालील मुद्दे विचाराकरीता माझे समोर उपस्थित झाले व त्याची कारणमिमांसा मी पुढीलप्रमाणे देत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | प्रतिवादी क्र.३ व ४ यांनी सकृतदर्शनी केस सिध्द केली आहे काय ? | ... **नकारार्थी.** |
| २. | न्यायाचा समतोल प्रतिवादी क्र.३ व ४ बाजूने जातो काय ? | ... **नकारार्थी.** |

३. अर्ज नामंजूर केल्यास प्रतिवादी क्र.३ व ४ यांची अपरिमित अशी हानी होईल काय ? ... **नकारार्थी.**

४. आदेश काय ? ... **अंतिम आदेशाप्रमाणे.**

**<u>का र ण मि मां सा</u>**

**<u>मुद्दा क्र.१ ते ३</u> :-**

०४. प्रतिवादी क्र.३ व ४ यांनी सदरच्या अर्जाद्वारे प्रतिवादी क्र.५ ते ७ यांनी दाव्याचा अंतिम निकाल लागेपावेतो दावा कलम १ मध्ये नमूद केलेल्या मिळकतीमध्ये कोणतेही बांधकाम करू नये व मिळकतीचे स्वरूपात बदल करू नये असा तुर्तातूर्त मनाई आदेश मिळावा अशी मागणी केली आहे.

०५. प्रतिवादी क्र.३ व ४ यांचे सदरच्या अर्जात असे कथन आहे की, वादी यांनी दावा प्रतिवादींविरूध्द दावा मिळकतींचे सरस निरस मानाने वाटप होवून मिळावे, पृथ्थक कब्जा मिळावा व दि.२२/१२/२०१० रोजीचे खरेदीपत्र त्यांचे हिश्यावर बंधनकारक नाही असा जाहिर ठराव होवून मिळावा यासाठी दाखल केलेला आहे. दाव्याची आदेशिका प्राप्त झाल्यानंतर प्रतिवादी क्र.३ व ४ यांनी न्यायालयात हजर होवून नि.क्र.४३ ला कैफियत दाखल केलेली आहे. त्यांनी देखील वादीप्रमाणेच मागणी केलेली आहे. दाव्याचे काम चौकशीकामी प्रलंबित असताना प्रतिवादी क्र.५ व ६ यांनी त्यांना दावा मिळकतीमध्ये कोणताही हिस्सा प्राप्त होत नसताना दावा कलम १ मध्ये नमूद असलेली घर मिळकत म्हणजेच मौजे हजारमाची, ता. कराड, जि. सातारा येथील ग्रामपंचायत मिळकत क्र.५६५ ही मिळकत दि.२५/०६/२०२५ रोजी जे.सी.बी. च्या सहाय्याने काढली व सदर जागेवर नव्याने घराचे बांधकाम करण्याचे प्रयत्नात आहेत. सदर मिळकत वादी व प्रतिवादी क्र.१ ते ४ यांची वडीलोपार्जित मिळकत आहे. सदर मिळकत आजही मयत प्रतिवादी क्र.१ यांचेच नावे ग्रामपंचायतीचे अभिलेखाला नोंदलेली आहे. सदर मिळकतीमध्ये वादी व प्रतिवादी क्र.२ ते ४ यांचे शिवाय इतर

कोणाचेही हक्क व हितसंबंध नाहीत. असे असताना प्रतिवादी क्र.५ व ६ यांनी दावा प्रलंबित असताना वर नमूद मिळकतीचे वाटप होवू नये, वाटपास व्यत्यय यावा या हेतूने जाणूनबुजून सदर घर मिळकत पाडून मिळकतीचे नुकसान केलेले आहे. प्रतिवादी क्र.५ व ते ७ यांचा सदर मिळकतीशी कोणताही संबंध नाही. त्यांना कायद्याने कोणताही हक्क प्राप्त होत नाही. प्रतिवादी क्र.७ ही प्रतिवादी क्र.५ यांची मुलगी आहे. प्रतिवादी क्र.६ हा प्रतिवादी क्र.५ यांचा मुलगा आहे. प्रतिवादी क्र.५ ते ७ हे एकविचाराने वागत आहेत. ते जाणूनबुजून प्रतिवादी क्र.३ व ४ यांचे हक्क डावलू पाहत आहेत. त्यांना सदर मिळकतीवर बांधकाम करण्याचा कोणताही अधिकार नाही. म्हणून प्रतिवादी क्र.३ व ४ यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. अर्ज मंजूर न झाल्यास त्यांचे कशानेही न भरून येणारे नुकसान होणार आहे. याउलट, अर्ज नामंजूर केल्यास प्रतिवादी क्र.५ ते ७ यांचे काहीही नुकसान होणार नाही. न्यायाचा समतोल प्रतिवादी क्र.३ व ४ यांचे बाजूने आहे.

०६. प्रतिवादी क्र.५ ते ७ यांचे म्हणण्यात असे कथन आहे की, प्रतिवादी क्र.३ व ४ यांनी प्रतिदावा केलेला नाही. तात्पुरत्या मनाई हुकूमाच्या अर्जातील कथने खोटी व लबाडीची असल्याने तो अर्ज कायद्याने चालू शकत नाही. जगन्नाथ शंकर सुर्वे व प्रतिवादीक्र.५ ते ७ हे सदर जागेत पूर्वीपासून राहत आहेत. त्यांच्याकडेच घराच्या जागेचा ताबा आहे. ग्रामपंचायत हजारमाची यांनी सर्वे केला असता घर मिळकत क्र.५६५ ही राहण्यास धोकादायक आहे, तिची दुरूस्ती करून घ्यावे असे लेखी स्वरूपात ग्रामपंचायतीने पत्र दिलेले आहे. घर मिळकत ही धोकादायक झालेली आहे. सदर मिळकतीमध्ये निवारा करण्याच्या हेतूने बांधकाम चालू आहे. सदरील बांधकामामुळे प्रतिवादी क्र.३ व ४ यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. सदर मिळकतीमध्ये प्रतिवादी क्र.३ व ४ यांना कायद्याने हक्क व हिस्सा येत असला तरी सदर मिळकतीमध्ये प्रतिवादी क्र.५ व ६ हे त्यांच्या कुटुंबियांसमवेत वास्तव्यास आहेत. सदर मिळकत धोकादायक झाली असल्यामुळे प्रतिवादी क्र.५ व ६ यांच्या जिवीतास धोका निर्माण

झाला आहे. सदरील मिळकतीची भिंत कोसळून जिवीतहानी होण्याची दाट शक्यता आहे. अशा परिस्थितीत मनाई हुकूम दिल्यास प्रतिवादी क्र.५ व ६ यांचे अपरिमित असे नुकसान होणार आहे. प्रतिवादी क्र.३ व ४ यांनी प्रतिवादी क्र.५ ते ७ यांना मानसिक व आर्थिक त्रास देण्याच्या हेतूने दाखल केलेला असल्यामुळे तो खर्चासह नामंजूर करावा व नुकसान भरपाई म्हणून र.रू.५०,०००/– त्यांना द्यावेत अशी विनंती त्यांनी केलेली आहे.

०७. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.३ व ४ यांनी प्रतिवादी क्र.५ ते ७ यांचे विरूध्द दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ अन्वये दाखल केलेला असल्याने आलेला पुरावा हा प्राथमिकदृष्टया तपासण्यात येत आहे. तात्पुरत्या मनाई हुकूमाचा आदेश करतेवेळी प्रथमदर्शनी केस पाहत असताना मागणी करण्यात आलेल्या दावा मिळकतीवर कायदेशीर कब्जा कोणाचा आहे हे पाहणे जास्त संयुक्तीक व गरजेचे आहे. यावेळी पुराव्याची सक्तरित्या मागणी करता येणार नाही. अशा परिस्थितीमध्ये आलेल्या कागदपत्रांचे प्रथमदर्शनी अवलोकन करणे आहे.

०८. प्रतिवादी क्र.३ व ४ यांनी त्यांचे अर्जातील कथनाचे व युक्तीवादाचे समर्थनार्थ नि.क्र.१६३ चे वर्णन यादीसमवेत ग्रामपंचायत मिळकत क्र.५६५ चा आकारणी यादीचा उतारा, तीन रंगीत फोटो, माहितीच्या अधिकाराखाली दाखल केलेल्या अर्जाची कार्यालयीन प्रत पोस्टाची पावती व नोंदणीकृत पोस्टाची पावती अभिलेखावर दाखल केलेली आहे. आकारणी यादीच्या उता–यावरून असे दिसून येते की, ग्रामपंचायत मालमत्ता क्र.५६५ हा दि.११/०७/२०२५ रोजी आकारणी यादीचा उतारा काढला असता जगन्नाथ शंकर सुर्वे यांचेच नावावर मालक सदरी नोंद असल्याचे व भोगवटदारसदरी स्वत: नोंद असल्याचे दिसून येते. रंगीत तीन फोटोंवरून असे दिसून येते की, नमूद मिळकतींमध्ये जे.सी.बीच्या सहाय्याने माती काढण्याचे, जमिन सपाटीकरण करण्याचे व बीम व कॉलम चे काम सुरू असल्याचे दिसून येते. माहितीच्या अधिकाराखाली कागदपत्र मिळावे याकरीता दिलेल्या अर्जावरून दिसून येते की, वादी यांनी सदरचा अर्ज दावा कलम १ क मध्ये नमूद असलेल्या मिळकतीमध्ये बांधकाम परवाना घेतला असल्यास

त्याबाबतच्या कागदपत्रांची मागणी केलेली दिसून येते.

०९. प्रतिवादी क्र.३ व ४ यांचेच कथनावरून असे दिसून येते की, सद्य स्थितीत दावा कलम १क या मिळकतीवर प्रतिवादी क्र.५ ते ७ यांची कब्जेवहिवाट आहे. प्रतिवादी क्र.५ ते ७ यांचे त्यांचे म्हणण्यामध्ये असे कथन आहे की, दावा कलम १क मध्ये नमूद असलेली मिळकत त्यांच्याच ताब्यात आहे. ती धोकादायक स्थितीत आहे. तिची दुरूस्ती केली नाही तर जिवीतहानी होवू शकते. प्रतिवादी क्र.५ ते ७ यांनी नि.क्र.१५९/१ वर ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत हजारमाची यांनी दि.२३/०५/२००५ रोजी दिलेला दाखला दाखल केलेला आहे. सदर दाखल्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, ग्रामपंचायत मिळकत क्र.५६५ ही राहण्यास धोकादायक आहे. सदर मिळकतीची दुरूस्ती करून घेणे आवश्यक आहे असे त्यामध्ये नमूद असल्याचे दिसून येते. नि.क्र.१५९/१ वर चार रंगीत फोटो दाखल केलेले दिसून येतात. सदर फोटोंवरून दगडी भिंत असलेले कौलाचे घर दिसून येते. कौलांची अवस्था मोडकळीस आल्याचे दिसून येते, तसेच भिंतींना मोठ्या भेगाही पडलेल्या दिसून येतात. नमूद दोन्ही कागदपत्र मिळकतीच्या अवस्थेबाबत प्रतिवादी क्र.५ ते ७ यांनी केलेल्या कथनास पुष्टी व दुजोरा देतात. तसेच प्रतिवादी क्र.५ ते ७ यांनी नि.क्र.१६५ चे वर्णन यादीसमवेत दोन रंगीत फोटो दाखल केलेले आहेत. सदरच्या दोन फोटोंवरून असे दिसून येते की, घराचे वीट व सिमेंटमध्ये बांधकाम पूर्ण होवून त्यावर स्लॅबही टाकण्यात आलेला आहे.

१०. प्रतिवादी क्र.३ व ४ यांचे असे कथन आहे की, दावा मिळकती या वादी व प्रतिवादी क्र.१ ते ४ यांच्या वाडवडीलार्जित मिळकती आहेत. दावा कलम १क मध्ये नमूद केलेली घर मिळकत ही मयत प्रतिवादी क्र.१ यांचे नावावर आहे. दावा मिळकतीमध्ये वादी व प्रतिवादी क्र.२ ते ४ यांचेशिवाय इतर कोणाचाही हक्क व अधिकार नाही. याउलट, प्रतिवादी क्र.५ ते ७ यांचे असे कथन आहे की, दावा मिळकत १क वर त्यांचाच कब्जा आहे. दावा मिळकतींमध्ये त्यांचेही हक्क व हितसंबंध असून त्यांनाही कायदेशीर हक्क प्राप्त होतो. प्रतिवादी क्र.३ व ४ आणि प्रतिवादी क्र.५ ते ७ यांचे विधीज्ञांनी तात्पुरत्या मनाई

हुकूमाच्या अर्जावर युक्तीवाद करताना उभय पक्षकारांनी अभिलेखावर दाखल करण्यात आलेल्या त्यांच्या अनुक्रमे नि.क्र.४३ व नि.क्र.८० वर दाखल असलेल्या कैफियतींमधील कथनांचा देखील आधार घेतलेला आहे. वादी व प्रतिवादी क्र.३ व ४ यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र.५ ही जगन्नाथ शंकर सुर्वे यांची बेकायदेशीर पत्नी आहे. प्रतिवादी क्र.६ व ७ ही जगन्नाथ यांची अनौरस मुले आहेत. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, ज्यावेळी दावा दाखल केला होता त्यावेळी जगन्नाथ शंकर सुर्वे यांना प्रतिवादी क्र.१ म्हणून दाव्यात सामील केले होते. त्यावेळी ते हयात होते. दाव्याची कार्यवाही प्रलंबित असताना जगन्नाथ शंकर सुर्वे हे दि.२०/०४/२०२१ रोजी मयत झालेले आहेत त्याबाबतचा मृत्यूचा दाखला नि.क्र.१३४ समवेत दाखल केलेल्या वर्णनयादी समवेत अभिलेखावर दाखल आहे. तसेच, वादी यांनी नि.क्र.१३२ वर दुरूस्तीचा अर्ज दाखल करून त्यामध्ये प्रतिवादी क्र.१ यांचे नावास कंस करून समोर मयत लिहिण्यास परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे. सदरचा अर्ज या न्यायालयाचे पूर्व पिठासिन अधिकारी यांनी दि.०२/०८/२०२२ रोजी मंजूर केलेला दिसून येतो.

११. दुसऱ्या पत्नीला तिच्या पतीच्या मालमत्तेतील वाटा मिळण्याचा हक्क, ज्यामध्ये विभाजनाचाही समावेश आहे, तो लागू कायद्यांनुसार तिच्या लग्नाच्या वैधतेवर अवलंबून असतो. जर दुसरे लग्न कायदेशीररित्या वैध मानले गेले, तर तिला पहिल्या पत्नी आणि मुलांप्रमाणेच मालमत्तेत वाटा मिळू शकतो. तथापि, जर पहिली पत्नी जिवंत असल्याने दुसरे लग्न रद्दबातल ठरले तर तिला वाटा मिळू शकणार नाही. जर पहिल्या पत्नीच्या मृत्यूनंतर किंवा घटस्फोटानंतर दुसरे लग्न झाले तर ते सामान्यतः कायदेशीररित्या वैध मानले जाते. अशा प्रकरणांमध्ये, दुसऱ्या पत्नीला सामान्यतः पहिल्या पत्नीप्रमाणेच पतीच्या मालमत्तेचा वाटा मिळण्याचा हक्क असतो, ज्यामध्ये विभाजनाचा अधिकार देखील समाविष्ट असतो. जर पहिली पत्नी जिवंत असताना आणि घटस्फोटाशिवाय दुसरे लग्न झाले तर ते हिंदू विवाह कायद्यासारख्या अनेक

वैयक्तिक कायद्यांनुसार द्विविवाह आणि रद्दबातल मानले जाते. या प्रकरणात, दुसऱ्या पत्नीला सामान्यतः पतीच्या मालमत्तेवर कोणताही कायदेशीर दावा नसतो, ज्यामध्ये विभाजनाचे अधिकार समाविष्ट असतात. जर दुसरा विवाह वैध असेल, तर दुसरी पत्नी तिच्या पतीच्या मालमत्तेतून, ज्यामध्ये वडिलोपार्जित आणि स्वतः मिळवलेल्या मालमत्तेचा समावेश आहे, पहिल्या पत्नीप्रमाणेच वारसा मिळवू शकते.

१२. हिंदू विवाह कायद्याच्या कलम १६ अंतर्गत रद्दबातल किंवा रद्दबातल विवाहातून जन्मलेल्या मुलांना कायदेशीर मानले जाते आणि विभाजनानंतर त्यांना त्यांच्या पालकांच्या मालमत्तेत, वडिलोपार्जित मालमत्तेसह, वाटा मिळण्याचा अधिकार आहे. तथापि, ते त्यांच्या पालकांच्या नातेवाईकांच्या मालमत्तेत वाटा मागू शकत नाहीत. हिंदू विवाह कायद्याच्या कलम १६ मध्ये रद्दबातल किंवा रद्दबातल विवाहांपासून जन्मलेल्या मुलांना वैधता दिली आहे. या मुलांना वारसा हक्कासाठी कायदेशीर मुले मानले जाते आणि त्यांना त्यांच्या पालकांच्या मालमत्तेचा वारसा मिळण्याचा अधिकार आहे. दोन्ही विवाहांमधील मुलांना सामान्यतः त्यांच्या वडिलांच्या मालमत्तेचा वारसा मिळण्याचा समान अधिकार असतो. रद्दबातल किंवा रद्दबातल विवाहातील मुलांचे हक्क त्यांच्या पालकांच्या मालमत्तेपुरते मर्यादित आहेत, मग ते स्वतः मिळवलेले असोत किंवा वडिलोपार्जित असोत. ही मुले विभाजनानंतर त्यांच्या पालकांच्या मालमत्तेत, वडिलोपार्जित मालमत्तेसह, वाटा मागू शकतात. जेव्हा वडिलोपार्जित मालमत्तेची विभागणी केली जाते, तेव्हा या मुलांच्या पालकांचा वाटा त्यांची स्वतःची मिळवलेली मालमत्ता मानला जातो आणि मुले त्यात वाटा मागू शकतात. ही मुले त्यांच्या पालकांच्या हयातीत वडिलोपार्जित मालमत्तेचे विभाजन मागू शकत नाहीत, परंतु त्यांच्या पालकांच्या मृत्यूनंतर ते तसे करू शकतात. जर एखाद्या पुरूषाला वैध विवाहापासून मुले असतील आणि रद्द झालेल्या विवाहापासूनही मुले असतील तर, दोन्ही मुलांचे गट विभाजनानंतर पुरूषाच्या मालमत्तेत वाटा घेण्यास पात्र असतील अशी कायदेशीर तरतूदी आहेत.

१३. प्रस्तुत प्रकरणामध्ये प्रतिवादी क्र.५ यांचा विवाह वैध आहे किंवा अवैध आहे याबाबतचा पुरावा अद्यापपावेतो अभिलेखावर येणे बाकी आहे. सद्य स्थितीत केवळ प्राथमिक स्वरूपात कथने अभिलेखावर आहेत. त्यावरून असे दिसून येते की, प्रतिवादी क्र.२ शांताबाई यांचे हयातीमध्येच जगन्नाथ शंकर सुर्वे यांना प्रतिवादी क्र.५ चंद्रभागा यांच्यापासून प्रतिवादी क्र.६ व ७ ही मुले झालेली आहेत. हिंदू विवाह कायद्याच्या कलम १६ मध्ये रद्दबातल किंवा रद्दबातल विवाहांपासून जन्मलेल्या मुलांना वैधता दिली आहे. या मुलांना वारसा हक्कासाठी कायदेशीर मुले मानले जाते आणि त्यांना त्यांच्या पालकांच्या मालमत्तेचा वारसा मिळण्याचा अधिकार आहे. या कायद्याच्या स्थापित स्थितीचा विचार करता प्रतिवादी क्र.६ व ७ यांना देखील जगन्नाथ शंकर सुर्वे यांच्या मालमत्तेचा वारसा मिळविण्याचा अधिकार प्राप्त झालेला दिसून येतो. जरी प्रतिवादी क्र.६ व ७ हे त्यांच्या पालकांच्या हयातीत वडिलोपार्जित मालमत्तेचे विभाजन मागू शकत नाहीत, परंतु त्यांच्या पालकांच्या मृत्यूनंतर ते तसे करू शकतात. प्रस्तुत प्रकरणामध्ये प्रतिवादी क्र.६ व ७ यांच्या वडीलांचे निधन दाव्याची चौकशी प्रलंबित असताना झालेली आहे त्यामुळे त्यांनाही दावा मिळकतीमध्ये अधिकार प्राप्त झाल्याचे प्रथमदर्शनी दिसून येतात.

१४. वर सविस्ताराने नमूद केलेल्या प्रतिवादी क्र.३ व ४ यांचेच कथनांवरून व कागदपत्रांवरून सद्य स्थितीमध्ये दावा मिळकतीवर प्रतिवादी क्र.५ ते ७ यांचा कब्जा असल्याचे दिसून येतो. प्रतिवादी क्र.३ व ४ यांनी दाखल केलेली कागदपत्रे त्यांचे कथन की, प्रतिवादी क्र.५ ते ७ यांचा दावा मिळकतीमध्ये कोणताही हक्क व हितसंबंध नाही या त्यांच्या कथनास पुष्टी व दुजोरा देणारे दिसून येत नाहीत. प्रतिवादी क्र.३ व ४ यांचेतर्फे करण्यात आलेला युक्तीवाद त्यांच्या कथनास पुष्टी व दुजारो देणारा दिसून येत नाही. पुराव्याचे स्वरूप हे प्रतिज्ञापत्र विरूध्द प्रतिज्ञापत्र असे झालेले आहे. प्रतिवादी क्र.५ ते ७ यांनी दाखल केलेली कागदपत्रे दावा मिळकतीवर त्यांचा कायदेशीर कब्जेवहिवाट आहे या त्याच्या कथनास पुष्टी व दुजोरा देतात. वरील सर्व विवेंचनाचा व केलेल्या ऊहापोहाचा

विचार करता प्रतिवादी क्र.३ व ४ यांनी प्रथमदर्शनी केस सिध्द केलेली नाही असा निष्कर्ष मी नोंदवित आहे. प्रतिवादी क्र.३ व ४ यांनी प्रथमदर्शनी केस सिध्द केलेली नसल्याने न्यायाचा समतोल हा प्रतिवादी क्र.५ ते ७ यांचे बाजूने जातो व अपरिमित नुकसान हे देखील प्रतिवादी क्र.५ ते ७ यांचेच होणार आहे. प्रस्तुत अर्जाचा विचार करतेवेळी अभिलेखावर दाखल असलेले कागदपत्र, प्रतिवादी क्र.३ व ४ आणि प्रतिवादी क्र.५ ते ७ यांचे तर्फे दाखल करण्यात आलेली प्रतिज्ञापत्रे यांचा विचार करण्यात आलेला आहे. ही कागदपत्रे औपचारीक स्वरूपात विचारात घेण्यात आलेली आहेत. येथे प्रामुख्याने हे नमूद करणे आवश्यक आहे की, प्रतिवादी क्र.३ व ४ यांनी प्रस्तुत अर्जाद्वारे प्रतिवादी क्र.५ ते ७ यांनी दावा कलम १क मध्ये नमूद केलेल्या मिळकतीमध्ये कोणतेही बांधकाम करू नये व दावा मिळकतीचे स्वरूप बदलू नये अशी तुर्तातूर्त ताकीद द्यावी अशी विनंती केली आहे. परंतू, अभिलेखावर दाखल करण्यात आलेल्या नि.क्र.१६५ चे वर्णन यादीसमवेत दाखल असलेल्या फोटोंवरून असे दिसून येते की, या अगोदरच जुने घर पाडले गेलेले आहे, नवीन घर बांधले गेलेले आहे व त्यावर स्लॅबही टाकला गेलेला आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.३ व ४ यांचा अर्ज निष्फळ ठरलेला आहे. तात्पुरत्या मनाई हुकूमाच्या अर्जाचा विचार करावयाचा असल्याने सदरच्या कागदपत्रांबाबत सक्तरित्या पुरावा मागण्यात आलेला नाही. वर नोंदविलेली निरीक्षणे/ निष्कर्ष हे केवळ नि.क्र.१५० च्या अर्जापुरते मर्यादीत आहेत. या सर्व बाबींचा विचार करता प्रतिवादी क्र.३ व ४ यांनी मुद्दा क्र.१ ते ३ हे सिध्द केलेले नसल्याने त्यांचा निष्कर्ष मी नकारार्थी नोंदवित आहे आणि मुद्दा क्र.४ करीता पुढील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## **आदेश**

नि.क्र.१५० चा तात्पुरत्या मनाई हुकूमाचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात येत आहे.

SUDHIR BALASAHEB TODKAR
Digitally signed by SUDHIR BALASAHEB TODKAR
Date: 2025.08.30 17:28:33 +0530

कराड. (एस. बी. तोडकर )

दिनांकः ३०/०८/२०२५ दिवाणी न्यायाधिश व.स्तर, कराड.